| CNR No.MHWR040005412020 | नोंदणी तारिख | १८/०७/२०२० |
|---|---|---|
| | दाखल तारिख | २१/०७/२०२० |
| | निकाल तारिख | २३/०३/२०२६ |
| | कालावधी | ०५ वर्षे, ०८ म, ०२ दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः २३/०३/२०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपीतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दि.२१/०४/२०२० रोजी वेळ १९.२५ ते १९.५५ वाजताच्या दरम्यान मारडा शिवार, समूद्रपूर, येथे आरोपीच्या ताब्यातुन एका प्लास्टीक चुंगडीत लहान प्लास्टीक पन्नीमध्ये ०५ लिटर गावठी मोहा दारु अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळुन आला आणि त्याव्दारे आरोपीने कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अंतर्गत गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## :: कारणमीमांसा ::

३. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार नामे वंदना पदमाकर बलवीर हिची साक्ष निशाणी क्र.०३ पुढे नोंदविली. पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोगपक्षाला यश आले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपीविरूध्द गुन्ह्या संदर्भात विधाने आल्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली आहे. आरोपीने त्याच्या बचावात खोटी केस केल्याचा तसेच त्याला काही माहित नसल्याचा बचाव घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये तसेच आरोपीतर्फे विद्वान वकील आर.व्ही.मुन यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

**मुद्दा क्र. १ करीता** :

४. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी, आरोपी स्वत:च्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी गावठी मोहा दारु विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आला, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने साक्षीदार क्र.१ वंदना पदमाकर बलवीर हिची साक्ष निशाणी क्र.०३ पुढे तपासण्यात आली आहे. तिने तिच्या साक्षीमध्ये कथन केले की, पोलीसांनी तिला दि.२१/०४/२०२० मौजा मारर्डा शिवारात पंचनामा करण्याकरिता बोलविले होते. ती पोलीसांसोबत तिथे गेली असता आरोपी हा त्या ठिकाणी दारु विक्री करतांना मिळुन आला. ते त्याला दिसले असता तो तेथुन पडुन गेला. पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता तेथे असलेल्या चुंगळीत छोटया छोटया प्लास्टीकच्या पन्न्यामध्ये तोड बांधुन असलेल्या पन्नया मिळुन आल्या. पोलीसांनी त्या पन्नयापैकी एक पन्नी उघडुन पाहिले व त्याचा वास घेतला. तसेच तिला देखील वास दिला. त्यावरुन त्यामध्ये दारु असल्याचे लक्षात आले. पोलीसांनी

काही दारु एका बॉटलमध्ये भरुन त्यास तिचे समक्ष सिल केले. त्याबाबत पंचनामा तयार केला व त्यावर त्यांच्या सहया घेतल्या. तिला सदरचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर तिची सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे तिने सांगितले. आरोपीतर्फे वकिलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता तिने मान्य केले आहे की, ती दारुबंदी महिला मंडळामध्ये काम करते. तसेच आरोपीतर्फे वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात सदरच्या साक्षीदाराने नाकारले आहे की, तिने पंचनामा सही करण्यापुर्वी वाचुन पाहिला नाही, पंचनाम्यावरील सही तिने मारर्डा गावामध्ये केली होती, ती घटनास्थळावर कधी ही गेली नाही तसेच पोलीसांनी तिचे समक्ष कोणतीही दारु जप्त केली नाही.

६. जरीही अभियोगपक्षातर्फे रासायनिक तज्ञाचा अहवाल अभिलेखावर सादर करण्यात आला, परंतू त्याअनुषंगाने त्यांनी साक्षीदार तपासुन सदरचा अहवाल सिद्ध केलेला नाही. तसेच रासायनिक परीक्षणाकरीता नेलेला नमुना कोणत्या मोहररने नेला त्या मोहररची साक्ष तपासण्यात आली नाही. आरोपीच्या ताब्यातून वर नमुद मुद्देमाल जप्तीची बाब व आरोपीविरुध्द कुठलाही ठोस किंवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरले आहे.

७. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने तपासी अंमलदार तपासलेले नाहीत. अभियोग पक्षाने आरोपीवरील विषयांकित गुन्हे सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंचनामा सिध्द करण्यासाठी मौका जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदाराला तपासले आहे. परंतु पंच साक्षीदार क्र.१ ची साक्ष ला दुजोरा देण्याकरिता अभियोगपक्षाने एकही इतर साक्षीदार तपासलेले नाही. अभियोग पक्षास वारंवार संधी देऊन देखील इतर साक्षीदारांना हजर करण्यात आले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करण्यास अपयशी ठरले आहे. अशा परिस्थितीत घटनास्थळावरून आरोपीच्या ताब्यातुन एका प्लास्टीक चुंगडीत लहान प्लास्टीक पन्नीमध्ये ०५ लिटर गावठी मोहा दारु मिळुन आली, ही बाब सिध्द झालेली नाही.

८. त्यामुळे संचीकेवरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन करता अभियोग

पक्षाने आरोपीविरूध्दचा महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) चा गुन्हा आरोपीने केल्याचे सिध्द केलेले नाही या निष्कर्षावर मी पोहोचले आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :**

९. अपराध क्रमांक ७२/२०२० मधील जप्त मुद्देमाल जागीच पंचासमक्ष नाश केल्यामुळे त्याबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही. वरील मुद्यांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हा ठेवलेल्या आरोपामधुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी **सचिन किसनाजी उरकुडे** याला महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वयेच्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) अपराध क्रमांक ७२/२०२० मध्ये जमा करण्यात आलेली सुरक्षा राशी रक्कम आरोपीला अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

४) आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७-अ] प्रमाणे रु.१५,०००/- किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.03.24 10:20:02 +0530

(एस.आर.सातभाई)

**<u>दिनांक</u>** : २३/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)